**नि.क्र.८० च्या आदेशावरुन वादी तर्फे सा.क्र.३**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – नागेश बाळू यमगर.

**वय** – ३९ वर्ष, **व्यवसाय** – सहा. पोलिस निरीक्षक,

**नेमणूक**– पोलिस ठाणे, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**१.** मी आजरा पोलिस ठाण्यात स. पो. नि. या पदावर कार्यरत असून मला साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. पोलिस ठाण्यातील अभिलेखाप्रमाणे वादी जनाबाईने दि.०४.११.२०१४ रोजी उपविभागीय कार्यालय, गडहिंग्लज यांना दिलेला तक्रारअर्ज तपासासाठी आजरा पोलिस ठाण्याकडे पाठवण्यात आला होता. मी त्या अर्जाची सत्यप्रत दाखल केली आहे. आता मला ती दाखवली, सदर अर्ज मूळ प्रती प्रमाणे बरोबर आहे. तिला **नि. क्र.९०** देण्यात येतो.

**२.** सदर तक्रारीवरुन आमच्या पोलिस ठाण्यातील कर्मचारी पो. ना. जे. व्ही. हांगे यांनी वादी जनाबाई, साक्षीदार संगिता संजय पाटील, सरीता विठोबा घुरे आणि आणखीन एका साक्षीदाराचा जबाब नोंदवला होता. सदर शेवटी नोंदवलेल्या साक्षीदाराच्या जबाबाची वरील बाजूची कागदपत्रे उंदराने कुरतडलेली असल्यामुळे त्याचे नाव सदर कागदपत्रात दिसून येत नाही. मी दाखल केलेले साक्षीदार जनाबाई, संगिता व सरीता यांच्या जबाबाच्या प्रती मूळ प्रतीप्रमाणे बरोबर आहेत. त्यांना अनुक्रमे **नि. क्र.९१ ते ९३** देण्यात येतात.

**३.** सदर तपासानंतर कर्मचारी हांगे यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी, गडहिंग्लज यांना अहवाल सादर केला होता. आता मला त्या अहवालाची प्रमाणित प्रत दाखवली, ती मूळ अहवाला प्रमाणे बरोबर आहे. तिला **नि. क्र.९४** देण्यात येतो. सदरची तक्रार फसवून हक्कसोडीचा दस्त करुन घेतल्याबाबत करण्यात आली होती. त्या तपासामध्ये वादी व तिच्या मुलीने दस्तावरती तो न वाचता सहया केल्याचे कबूल करुन त्याबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल असल्याचे सांगितले होते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादीं तर्फे उलटतपास – श्री. जी. टी. ठाकूर वकील.</u>**

**४.** नि. क्र.९० ची प्रत सर्वप्रथम आमच्या पोलिस ठाण्यात देण्यात आलेली नसून ती गडहिंग्लज येथील वरिष्ठ कार्यालयातून प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारअर्जा प्रमाणे दिवाणी दावा प्रलंबित असल्यामुळे पुढील तपास करण्यात आलेला नाही. नि. क्र.९० ते ९४ वरील कारवाई झालेल्या कारवाईत मी आजरा पोलिस ठाण्यात कार्यरत नव्हतो. सदर कारवाईमध्ये वादी अथवा साक्षीदारांनी तक्रार मागे घेत असल्याबाबतचा जबाब दिलेला नाही. तक्रारअर्ज निकाली काढण्याबाबत वादी व साक्षीदारांनी संमती दिली होती.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०३.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते